साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

वर्ष 31 वे

| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१२७ | पाने-१२ | दि.२/६/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रु.




# दहावीच्या परीक्षेत शिवांजली महेश राऊत करमाळा तालुक्यात प्रथम

## म.गांधी विद्यालयाची केतकी कोरपे तर जेऊरचा हर्षवर्धन वाघमारे तालुक्यात द्विितीय

करमाळा : दहावीच्या परीक्षेत करमाळा येथील कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयातील विद्यार्थीनी शिवांजली महेश राऊत हिचा ९९.४० टक्के गुण मिळवत करमाळा तालुक्यात प्रथम क्रमांक आला आहे. तर महात्मा गांधी विद्यालयातील केतकी गणेश कोरपे (९७.२० टक्के) व जेऊर येथील भारत हायस्कुलचा विद्यार्थी हर्षवर्धन पांडूरंग वाघमारे (९७.२० टक्के) यांचा तालुक्यात द्विितीय क्रमांक आला आहे.

प्रथम



द्विितीय



द्विितीय



करमाळा येथील कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयातील विद्यार्थीनी शिवांजली राऊत हिचा ९९.४० टक्के गुण मिळवत तालुक्यात व विद्यालयात प्रथम क्रमांक आला आहे. द्विितीय क्रमांक पायल ज्योतिराम शिंदे (९५टक्के), तृतीय क्रमांक श्रावणी प्रकाश क्षीरसागर (९४.८० टक्के), चौथा क्रमांक सुचिता महादेव फंड (९४.६० टक्के), पाचवा क्रमांक सानिका गणेश क्षीरसागर (९३.८० टक्के) हिचा आला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन मुख्याध्यापक वशिक्षकांनी केले.

महात्मा गांधी विद्यालयाचा दहावीच्या परीक्षेचा एकूण निकाल ९३.२६ टक्के लागला आहे. तालुक्यात सर्वात जास्त ३१४ विद्यार्थ्यांनी बोर्ड परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी ३१२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यामध्ये २९१ विद्यार्थी उत्कृष्ट गुण मिळवत उत्तीर्ण झाले आहेत. तब्बल १२० विद्यार्थी विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत, १०३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ५२ विद्यार्थी द्विितीय श्रेणीत तर १६ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. केतकी गणेश कोरपे हिने ९७.२० टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला आहे. द्विितीय क्रमांक प्रणिती शिवाजी ढेरे (९६.४० टक्के), तृतीय क्रमांक उन्नती उत्कर्ष गांधी (९६.२० टक्के), चौथा क्रमांक श्रध्दा भालचंद्र (पान नं.३ वर..)



ज्याच्याकडे शब्दाचे जास्त भांडार तो सर्वात जास्त श्रीमंत...!

## संपादकीय..................................!

# मोफत मिळालेले धन !

संत तुकोबाराया हे तसे खुप श्रीमंत होते असे म्हणतात. त्यांची मालमत्ता मोजदाद करता येणार नाही इतकी संपत्ती होती असे म्हणतात. तरीही त्यांनी आपल्या अभंगवाणीत म्हटले की... "आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।। शब्द आमुच्या जिवाचे जिवन।शब्दे वाटू धन जनलोका ।।तुका म्हणे पहा शब्दची हा देव । शब्देची गौरव पूजा करू ।।" संत तुकोबारायांनी शब्द म्हणजे रत्न आणि शस्त्र आहे. समाजाला त्याची गरज लागते, ते धन म्हणजे शब्द आम्ही जनलोकांना देऊ एवढेच नाहीतर शब्द हाच देव व त्याची पुजासुध्दा शब्दांनेच करू. थोडक्यात शब्द म्हणजे काय आहे यापेक्षा शब्द म्हणजे काय नाही ..? शब्द म्हणजे सर्वच आहे.

व.पु. काळे यांच्या "घर हारवलेली माणस" या कथा संग्रहात चिमणीची पहिली काडी या मनोगतात ते म्हणतात... "माझ्या नावावर ३३ पुस्तके आहेत.म्हणून मी जीवनाचा भाष्यकार नक्कीच झालेलो नाही. विनय नाही, अहंकार तर नाहीच नाही.!"

जीवनाचा भाष्यकार होण्यासाठी जीवन समजावं लागतं,संसाराचा अर्थ गवसावा लागतो. मला निरनिराळ्या संसारांनी कोडी घातली.कोडी सोडवण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या कथा झाल्या. कोडी तशीच राहिली.शब्दांचा व्यापार इतकी वर्षेकेला पण जिथून प्रारंभ केला तिथंच संसारानं मला आणून पुन्हा उभ केलं.

इथ शब्दांचा खरा अर्थ समजला. शिक्षक, प्राध्यापक, वृत्तपत्र, वकीली, किर्तनकार, प्रवचनकार, गायक, कथा-कथनकार, कवी , राजकर्ते आणि तत्सम बाबी म्हणजे शब्दांतून निर्माण झालेले व्यवहार किंवा व्यावसायीक म्हटले तर वावगे ठरणार नाही. यातून काही थेट पैसे मिळवतात तर काही सत्ता मिळवतात तर काही सन्मान आणि समोरच्याच्या हदयात स्थान मिळवतात. अर्थातच हा शब्दांचा व्यापार तसा साधा सोपा नाही. सोपा दिसत असलातरी तितका सहज सुलभ नाही. पत्रकाराला यासाठी खुप अभ्यास करावा लागतो, प्रत्यक्ष जावून माहिती घ्यावी लागते, माणसांना गाठून संदर्भ मिळवाले लागतात. वर्तमानाबरोबरच भुतकाळ व भविष्यवर नजर ठेवावी लागते.वकीलांना त्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते, कायद्याचा अभ्यास, उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाड्याचा आभ्यास, आपल्या केसचा आभ्यास, माणसं वाचावी लागतात, माणसांना बोलत करून साक्षीतून पुरवा हास्तगत करावा लागतो.मग उत्तम वकील होता येते.तीच बाब किर्तनकार, प्रवचनकार,शिक्षकांना लागू पडते.

शब्दांचा व्यापार हा केवळ या व्यवसायीकासांठीच नसतोतर प्रत्येक व्यक्तीला तो व्यापर करावाच लागतो. ज्याला शब्दांचा व्यापार करता आला तोच व्यवहारात टिकून रहातो. ज्याला ही जादु समजते तो कोणत्याही व्यवसायात यशस्वी होतो. मग किरणा दुकान असो नाहीतर दवाखाना असो, नाहीतर कापड दुकानदार असो. एकाच दवाखान्यात रूग्ण पुन्हा पुन्हा का जातो, याचे कारण त्या डॉक्टरांच्या हातातील जादू बरोबरच, त्या डॉक्टराच्या शब्दाची जादू महत्वाची ठरते.जिथे दवा आणि दुवा असतो तिथे रूग्ण हमखास बरा होतो.हा दुवा म्हणजेच शब्दांचे भांडार .एवढेच काय पण ज्या घरात पती-पत्नी एकमेकाशी सुसंवाद साधतात तिथे सुख,समाधान आणि आनंद असतो. अर्थातच ज्याला शब्दाचे सामर्थ समजते तेथेच सुसंवाद घडतो. एका परिवारात एकुलता एक मुलगा होता. तो अभियंता झाला. घरची गरीबी होती,पण तो कष्ट करून शिकला. उत्साही रहावं आणि समोरच्याला उत्साही कराव यात तो तरबेज होता.थोडक्यात तो शब्दाचा जादुगार होता. शिक्षणानंतर तो कनिष्ठ अभियंता म्हणून शासकीय कार्यालयात कामाला लागला. अत्ता लग्नाची गडबड सुरू झाली. कार्यकरी अभियंत्याने त्याची मुलगी त्याला देवू केली. तीच्या माहेरी मोठा बंगला,चारचाकी गाडी, हाताखाली शिपाई, घरात कामाला मोलकरणी. लग्न झाले आणि ती नवऱ्याबरोबर गावातील छप्परात गेली. घरात चुलीवर स्वयंपाक, विशेष म्हणजे लोटा परेड उघड्यावर.ती मुलगी पहिल्या दोन तासातच कोमेजून गेली. हे त्या नवरदेवाने ओळखले. तो तीला म्हणाला, तु नाराज झाली असशील, तुझ्या माहेरचे वैभव आणि इथे अठरा विश्व दारीद्या. पण तुझे वडीलांची श्रिमंती तुला या मुळे समजली असेल. तुला तुझ्या वडीलांनी काय कमवले व कसे वाढवले हे तुला दोन तासात कळाले असेल, तुझे आई-वडील किती ग्रेट आहेत हे कळले असेल. मला थोडी संधी दे , तुझा नवरा किती ग्रेट आहे हे तुला कळणे गरजेचे आहे. जर मी आधीच बंगला बांधला असता व सर्व सुविधा केल्या असत्यातर तुला कोणताच फरक कळाला नसता.मला तुझी साथ हवी. यावेळी निरास झालेली नववधु जेंव्हा त्यांने तीच्या आई-वडीलांचे कौतुक केले तेंव्हा ती सतेज झाली. तीला खरच तीच्या आई-वडीलांचा अभिमान वाटला आणि आपण किती मोठ्या घरात वाढलो हे त्याक्षणी समजले.त्याचवेळी आपण नवऱ्याच्या कर्तृत्वाला साथ देवून वडीलांचे वैभव पुन्हा मिळवण्याचा तिने निर्धार केला आणि त्या घरात आनंदाने राहण्याचे ठरवले. चमत्कार असा झाला की दोन वर्षातच त्यांच्या संसारात बदल झाला. शेती बदलली, घर बदलले, आणि लवकरच गाडी येणार होती. जर त्याचेकडे शब्दाची जादु नसतीतर ती मुलगी त्याच दिवशी किंवा, येती-जातीला जी गेली असती ती पुन्हा सासरी आलीच नसती.

समाजातील अनेक बाबी आपण पहातो, राज्याच्या माजी उपमुख्यमंत्री कै. आर.आर. आबा यांना पत्रकारांनी मुंबई दंगली बाबत प्रश्न केला तेंव्हा ते उत्तर देताना म्हणाले की... मुंबई शहर मोठे आहे. अशा शहरात अशा छोठ्या-मोठ्या घटना घडू शकतात. या उत्तरामुळे त्यांना राजीनामा देण्याची वेळ आली होती. नगर येथील माजी उपमहापैर श्रीपाद छिंदमची एका कामगाराला फोनवर बोलताना जीभ घसरली. या शब्दानंतर छिंदमची छदामाएवढीसुध्दा किमंत राहिली नाही. एवढेच नाहीतर त्याला जेल तर भोगावाच लागला पण हाद्पार व्हावे लागले होते.सन २०१७ मध्ये विश्वसुंदरी २०१७ चा किताब हरीयानाची डॉ. मानुषी छिल्लर हीला मिळाला. हा पुरस्कार कसा मिळाला...त्याची हकीकत अशी आहे. ज्यावेळी ती व तीच्या ३० स्पर्धक एक महिना एकत्र होत्या. त्यामुळे बहुतेक स्पर्धकांना एक प्रश्न विचारला तोच प्रश्न मनुषीला विचारला. की तू ३० स्पर्धकात एक महिना एकत्र राहिली तर तुला या तुझ्या सहकारी युवतीबद्दल काय वाटते..? त्यावर ती म्हणाली की...या माझ्या सहकारी स्पर्धकाकडे विशीष्ट दृष्टीकोन आहे, त्यामुळे त्या या जगात निश्चीत्तच बदलाव घडवून आणतील... या शब्दांनी तीची विश्वसुंदरी साठी निवड झाली. शब्दांनी तिला हे पद मिळाले. भारताला हे पद तब्बल १७ वर्षानंतर मिळाले. सन २००० ला प्रियंका चोप्राला मिळाले त्यानंतर सन २०१७ ला मनुषीला मिळाले.थोडक्यात शब्द माणसाला माणसात बसवतात आणि माणसातून उठवतात.

विनोबाजी म्हणतात.. "ऐशी बात बोलीये कोयी न बोले झुठ... तर कबीरजी म्हणतात... बोली बोल अमोल है... बोल सके तो बोल पहिले अंदर तौल कर फिर बहार खोल.." शब्दांचे भांडार खुप किमंतीचे पण भांडणात आपण ते कसे उधळतो.... कधी विचार केला. कारण नसताना उणे-दुणे काढतो, नको त्या शेलक्या शब्दांचा वापर करतो. म्हणजे आपणला परमेश्वराने जे धन दिले ते फुकट .आणि आपण से सुध्दा वाटतो फुकट.. जे शब्दावर पैसे कमवतात, जरा त्यांच्याकडे पहा, ते जर काहीही बोलले तर त्यांच्या शब्दाला कोणी पैसा मोजेल काय..? ॲड. हरीश साळवे सारखी व्यक्ती अंतरराष्ट्रीय न्यायालयात वकील म्हणून काम करतात. त्यांची लाखाच्या पटीत फी असते. ते काहीही बोलत राहिलेतर त्यांना सन्मान राखला जाईल का..? या सर्व बाबीचा विचार करून आपले धन सांभाळण्याची व योग्य ठिकाणी खर्च करण्याची गरज आहे.

**कामगार पाहिजे**

कॉम्प्युटर बिलिंगसाठी मुलगा/ मुलगी कामगार पाहिजे. गरजूंनी समक्ष भेटा !

संपर्क : मो.९४२३०६१३४९

**हॉल भाड्याने देणे आहे**

क्लासेससाठी हॉल भाड्याने देणे आहे. प्रशस्त पार्किंग, शांत परिसर 'यशोदीप' मंगळवार पेठ, करमाळा.

संपर्क : मो.९४०५७१३७६९

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

पान १ वरून पुढे..

# दहावीच्या परीक्षेत शिवांजली महेश राऊत करमाळा तालुक्यात प्रथम

यादव (९५.८० टक्के) व सहावा क्रमांक विनीत निलेश विधाते (९५.४० टक्के) याचा आला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार जयवंतराव जगताप, विश्वस्त व माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, शुंभराजे जगताप, प्राचार्य पी.ए.कापले, उपप्राचार्य बागवान सर, पर्यवेक्षक एस.टी.शिंदे, बी.के.पाटील यांनी केले आहे.

जेऊर येथील भारत हायस्कुलचा ९३.१८ टक्के निकाल लागला आहे. ३०८ पैकी २८७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवणारे २९ विद्यार्थी असून विशेष प्राविण्य मिळवणारे १३२ विद्यार्थी आहेत. क्रिडा शिक्षक पांडूरंग वाघमारे यांचे चिरंजीव हर्षवर्धन पांडूरंग वाघमारे यास ९७.२० टक्के गुण मिळाले असून त्याचा विद्यालयात प्रथम तर तालुक्यात द्वितीय क्रमांक आला आहे. विवेक सुर्यकांत बडे (९६.८७ टक्के), प्रथमेश महालिंग म्हमाणे (९५.८०टक्के) तर तन्वी दामाजी श्रीरामे (९५.४० टक्के) यांचे अनुक्रमे द्वितीय, तृतीय व चौथा क्रमांक आला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार नारायण पाटील, उपाध्यक्ष अनिल गादीया, सचिव प्रा.अर्जुन सरक, प्राचार्य केशव दहिभाते, उपप्राचार्य नागेश कांबळे, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे यांनी केले.

कुंभारगाव येथील शरदचंद्र पवार माध्यमिक विद्यालयाचा दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला आहे. हर्षाली पवार हिचा ९३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक आला असून द्वितीय क्रमांक श्रुती ढवळे (८९.८० टक्के), तृतीय क्रमांक राज शेडगे (८९.६० टक्के) याचा आला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन मुख्याध्यापक, सर्व शिक्षक तसेच संस्थेचे सचिव नानासाहेब आढाव सर यांनी केले आहे.

भैरवनाथ माध्यमिक विद्यालय, जातेगावचा दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकाल लागला असून, शिवानी देविदास गाढवे (८९ टक्के) हिचा प्रथम तर अमृता संतोष शिंदे व सानिका नानासाहेब शिंदे (८६.२० टक्के), आस्था शब्बीर सय्यद (८६ टक्के) यांचे अनुक्रम द्वितीय व तृतीय क्रमांक आले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व माजी आमदार जयवंतराव जगताप, माजी उपनगराध्यक्ष नारायण जगताप, माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, शंभुराजे जगताप, मुख्याध्यापक तानाजी माने यांनी केले.

श्री कमलादेवी कन्या प्रशाला, करमाळा चा एकूण निकाल ९२.७५ टक्के लागला असून रोशनी दत्तात्रय पवार (९०.२० टक्के), संजना अनिल मारडकर (८७.२० टक्के) व सानिका युवराज होगले (८३ टक्के) यांचे अनुक्रमे प्रथम, द्वितीयं व तृतीय क्रमांक आले आहेत.

दत्तकला इंटरनॅशनल स्कुल ॲन्ड ज्यु.कॉलेजचा दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकाल लागला आहे. अमृता शहाजी दराडे (९४.४० टक्के), आयुषी किरण कवडे (९२.६० टक्के), दिक्षा हरिभाऊ धुमाळ (९१.४० टक्के) यांचे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, उपाध्यक्ष राणादादा सुर्यवंशी, सचिव माया झोळ यांनी केले आहे.

# न.पा.चे कार्यालयीन अधिक्षक दिगंबर दत्तात्रय देशमुख सेवानिवृत्त

करमाळा (सं.प्र.) : करमाळा नगरपरिषदेचे कार्यालयीन अधिक्षक दिगंबर दत्तात्रय देशमुख हे सेवानिवृत्त झाले असून करमाळा नगरपरिषद कर्मचारी व अधिकारी यांनी सेवानिवृत्तीनिमित्त देशमुख यांचा सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला. श्री.देशमुख यांनी सन १९८७ ला जकात नाका इन्स्पेक्टर ते कार्यालयीन अधिक्षक या पदावर सेवा बजावली. एक मनमिळावू , अभ्यासू व कार्यकुशल, निर्भिड असे अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. प्रामाणिकपणा व सेवा तत्परता यामुळे करमाळा शहरातील लोकांचा विश्वास संपादन करून सर्वांच्या हृदयात त्यांनी स्थान मिळवले. त्यांच्या यशस्वी लोकाभिमुख सेवेबद्दल करमाळा नगरपरिषदेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# भारती पाखरे व विजया वलटे यांना अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्रदान

करमाळा(सं.प्र.) : उमरड येथील भारती महेंद्र पाखरे, विजया नंदकिशोर वलटे यांना सामाजिक क्षेत्रात केलेल्या कामाबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार ग्रामपंचायत कार्यालयात नुकताच देण्यात आला. पुरस्कार विजेत्या विजया वलटे यांनी महिला ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्य केले आहे. तसेच हिरकणी महिला बचत गटाच्या अध्यक्षा म्हणून महिलांना कर्ज उपलब्ध करून दिले आहे. तसेच महिला व बालकांच्या आरोग्य जागृतीच्या कार्यक्रमात भाग घेतला आहे. याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रम, लेडीज शॉपी सुरू करून स्वयंरोजगार निर्माण केला आहे. तर भारती पाखरे यांनी बचत गटाच्या माध्यमातून शंभर महिलांना सहभागी करून स्वावलंबी बनवले आहे. तसेच बचत गटाच्या सीआरपी म्हणून उल्लेखनीय काम केले आहे. पुरस्काराचे वितरण अहिल्याबाई होळकर यांचे जयंतीनिमित्त करण्यात आले. यावेळी ललिता वलटे व रंजना पाखरे यांचे हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी सरपंच बापूराव पडवळे, माजी सरपंच बापूराव चोरमले, उपसरपंच मुकेश बदे, मुख्याध्यापक हनुमंत चव्हाण, ग्रामविकास अधिकारी भालेराव, नंदकिशोर वलटे, महेंद्र पाखरे उपस्थित होते.

बचत गटाच्या माध्यमातून केलेल्या कामाची पोचपावती या पुरस्काराने मिळाली आहे. या पुरस्कारामुळे जोमाने काम करण्याची ताकद मिळाली असून कुटूंबातील पाठींबामुळे बचत गटाचे काम चांगल्याप्रकारे करू शकले. या पुरस्कारासाठी निवड केल्याबद्दल सर्व ग्रामस्थांचे आभार ! ...भारती पाखरे (पुरस्कारप्राप्त)

ADMISSION OPEN

ईशा पॅरामेडिकल & एज्युकेशनल इन्स्टिट्यूट
करमाळा., जि.सोलापूर
महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त

ॲग्रीकल्चर क्षेत्रात
करिअर घडवण्याची सुवर्णसंधी..!



ॲग्रीकल्चर कोर्स
डिप्लोमा इन ॲग्रीकल्चर टेक्नॉलॉजी
- शैक्षणिक पात्रता : १० वी पास
- कोर्स कालावधी : २ वर्षे

नोकरीची संधी...
- खते व बी-बियाणे खतांचे दुकान
- मार्केटींग कंपनीमध्ये
- दूध डेअरी व दूध प्रॉडक्शन कंपनीमध्ये
- व इतर अनेक संधी उपलब्ध

आरोग्य क्षेत्रात करिअर
घडवण्याची सुवर्णसंधी
पॅरामेडिकल कोर्से
- पात्रता 12 वी विज्ञान शाखा
- Optometry
- DMLT
- Diploma In Saintary Insepector
- Diploma In X-ray Technican
- All Paramedical Course Available

ॲग्रीकल्चर क्षेत्रात करिअर
घडवण्याची सुवर्णसंधी
ॲग्रीकल्चर कोर्से
- पात्रता : 10 वी
कोर्स कालावधी २ वर्ष
- Diploma In Agriculture Technology

शिष्यवृत्ती
योजना उपलब्ध
9970930153, 9730033124

पत्ता: सोलंकर बिल्डिंग, नगररोड, बायपास, मॉडर्न जीम, २ रा मजला, करमाळा., जि.सोलापूर.
संपर्क : मो.नं.9970930153, 973003314

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना **श्रीजय नेत्र रूग्णालय**
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# प्रांताधिकारी ज्योती कदम सह संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी

## मनसे ता.अध्यक्ष संजय घोलप यांचे महसुल विभागीय आयुक्तांना पत्र



करमाळा(सं.प्र.) : रेशनकार्डवर नाव वाढवताना सामान्य नागरीकांकडून पुरावे व संबंधित कागदपत्रे वारंवार तपासली जातात. त्यानंतरच रेशनकार्डवर नाव वाढवले जातात. पण करमाळा तालुक्यात सर्व नियम धाब्यावर बसवत चक्क २३ एकर जमीनच दुसऱ्याच्या नावे लाटल्याचे दिसून आले आहे. याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष संजय घोलप यांनी मुळ मालकांकडून कुलमुखत्यार यांनी आर्थिक व्यवहारातून सदर नोंदी लागल्याची तक्रार विभागीय आयुक्त पुणे विभाग यांच्याकडे केली आहे. यामध्ये त्यांनी तत्कालीन संबंधित महसुल अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

आपण जेव्हा तहसील परिसर व तहसील मध्ये कोणत्याही कामासाठी जाता, त्यावेळी त्या ठिकाणी विविध कागदपत्रांची तपासणी करूनच आपली कामे केली जातात कोणता कागद पुढे पाठवायचा आणि कोणता कागद थांबवायचा हे सरकारी बाबूंना माहितच आहे. एखाद्या कामाला उशीर झाला तर हरकत नाही, पण जमिनी व जागांचे व्यवहार जर परस्पर आर्थिक संबंधातून दुसऱ्यांच्या नावे लागू लागलेतर हा मोठा गंभीर प्रकार आहे. या प्रकारांमध्ये शासन व विभागीय आयुक्त लक्ष देणार का ? हा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे.

सदरच्या प्रकरणांमध्ये तक्रारदार यांची आजी ताराबाई यासिन जमादार या १९४७ पासून संरक्षित कुळ हक्काने जमीन वहिवाटत होत्या. त्यांच्यानंतर सदर जमीन हामिदाबी इस्माईल जमादार व अर्जदार हे कुळ हक्काने वहिवाटत होते. हमीदाबी यांचे पती इस्माईल यासीन जमादार यांना दोन पत्नी होत्या. एक हमीदाबी व दुसरी अंबीरबी. यातील अर्जदार हे हामिदाबी यांची मुले आहेत तर अंबीरबी यांना एक मुलगा अब्दुल सत्तार इस्माईल जमादार हा जन्माला आला. सुरूवातीपासून बीड येथे वास्तव्यास असलेल्या अब्दुल हा कधीच मुस्लिम कायद्यातील तरतुदीप्रमाणे वारस नव्हता. हमीदाबी यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच वारस आहेत. त्यामुळे त्यांना त्याचा अधिकार होता. परंतु अब्दुल सत्तार अर्जदार यांची आई हीच आपली आई असल्याचे तहसीलदार करमाळा यांना दाखवत सदर जमीन आपल्या नावे करून घेतली. पण ज्यावेळी अब्दुल सत्तार हा सावत्रभाऊ असल्याचे निदर्शनास आले. त्यावेळेस तहसील कार्यालयाने अर्जदारांची बाजू मांडण्याची संधी देणे अपेक्षित होते. परंतु त्यांनी तसे केले नाही. मुळ अर्जदार हे मालक असताना त्याशिवाय समोरच्या व्यक्तीने आपल्या आईची चुकीची माहिती देऊन वारस म्हणून नोंद केलेली असताना प्रशासन मात्र याकडे डोळेबंद करून बसले होते. सदरची वस्तुस्थिती असताना देखील तत्कालीन संबंधित प्रांताधिकारी, तहसीलदार, मंडल अधिकारी व तलाठी यांनी आर्थिक लाभापोटी सर्वोच्च न्यायालयाचे वेळोवेळी पारित केलेले आदेश न मानता अधिकाराचा व स्वत:च्या स्वार्थासाठी गैरवापर करून जमीन बेकायदेशीर विक्री हस्तांतरण परवानगी दिली आहे. अब्दुल सत्तार यांनी अधिकाऱ्यांशी संगणमत करून खोटे कागदपत्र व शपथपत्र करून उपविभागीय अधिकारी ज्योती कदम यांच्याकडून जमीन विक्री करण्यास परवानगी मागितली. याबाबतच्या कागदपत्राची तपासणी करण्याअगोदरच किंवा दुर्लक्ष करून करमाळा तत्कालीन संबंधित तहसीलदार, मंडल अधिकारी व तलाठी यांनी कोणतीही चौकशी न करता चौकशी अहवाल प्रांताधिकारी यांच्याकडे पाठवला व कागदपत्रे पुरावा निर्माण केला. यातून महसुल अधिकाऱ्यांशी संगणमत करून बोगस कागदपत्रे पुरावे तयार करून, कोर्टाचे स्थगित आदेश असतानाही अर्जदार यांचे नुकसान करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर नोंदणीकृत खरेदीखत दाखल करून शेतजमीन पठाण शहाजेब खान, पठाण मुस्तमीर खान यांना हस्तांतरीत केले आहे. तसेच सदर बेकायदेशीर हस्तांतरबाबत दुय्यद निबंधक करमाळा यांनी सदर विषयी तत्कालीन संबंधितांविरूध्द योग्य ती कारवाई करणेबाबत पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन करमाळा यांच्याकडे पत्रही दिले आहे. तरी या सर्वांवर योग्य ती कारवाई करावी; अशी मागणी विभागीय आयुक्त यांच्याकडे अब्दुल गफार इस्माईल जमादार यांच्यासह त्यांचे भाऊ-बहिण यांच्या वतीने कुलमुखत्यार संजय घोलप यांनी केली आहे.

# थकीत कर्जदारांना ओटीएस योजनेचा लाभ घ्यावा : दिलीप तिजोरे

करमाळा(सं.प्र.) : बँकेची थकीत कर्ज वसुली जून महिना अखेर एक कोटीचे टार्गेट असून ३१ जुलै अखेर तीन कोटीचे वसुलीचे टार्गेट आहे. शासनाची २७ एप्रिल २०२३ ची ओटीएस योजना बँकेच्या थकीत कर्जदारांना फायद्याचे असून, त्या कर्जदारांनी या योजनेचा लवकरात लवकर फायदा घेऊन आपली थकीत कर्जखाती बंद करण्याचे आवाहन प्रशासक दिलीप तिजोरे यांनी केले.

करमाळा अर्बन बँक कोरोना काळातील थकबाकीमुळे अडचणीत आली. त्याचा परिणाम रिझर्व्ह बँकेने कारवाई करून प्रशासकाची नियुक्ती केली. दिलीप तिजोरे यांनी प्रशासक पदाचा पदभार स्वीकारताच बँकेच्या अंतर्गत कमतरतेबरोबरच थकबाकी वसुलीचा धडाका लावला. जुनी कर्जखाते तत्पर वसुल होणेकामी शासनाची २७ एप्रिल २०२३ रोजीची नागरी सहकारी बँकांना लागू केलेली एक रकमी कर्ज परतफेड योजना बँकेने स्वीकारून आज अखेर ४५ लाखाची वसुली केलेली आहे. याबाबत तिजोरे यांनी म्हटले की, या योजनेच्या अनुषंगाने जे थकीत कर्जदार मयत झालेले आहेत त्यांच्या नातलगांनी थकीत कर्जदाराचा मृत्युचा दाखला बँकेत सादर करून या ओटीएस योजनेचा लाभ घ्यावा. कारण मृत्यू पावलेल्या कर्जदारांना या योजनेचा जास्तीत जास्त फायदा होणार आहे. तसेच इतर कर्जदारांच्या अनुषंगाने जी कर्जखाती अनु-उत्पादक झालेली आहेत व जी कर्ज खाती थकबाकी होऊन दोन वर्ष झालेली आहेत असा कर्ज खात्याचा दोन वर्षाचा थकीतचा बॅलन्स व त्यापुढील तीन वर्षाचे सहा टक्क्याने व्याज आकरून थकीत येणेबाकी अधिक सहा टक्क्याने येणारे व्याज अशी एकूण रक्कम ही तडजोड रक्कम राहणार आहे. त्यामुळे या योजनेच्या अनुषंगाने बँकेपेक्षा कर्जदाराचा जास्त फायदा होणार आहे. सदर ओटीएस योजनेची मुदत ३० जून अखेर संपुष्टात येणार असून ओटीएस योजनेचा लाभ न घेणाऱ्या कर्जदारांना सुचित करण्यात येते की, ओटीएस ही योजना संपुष्टात येताच उर्वरित थकीत कर्जदारांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करून त्यांच्या बँककडे तारण असलेल्या स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करून त्यांची जाहीर लिलावाद्वारे विक्री करून थकीत कर्जाची वसुली करण्यात येईल. जे कर्जदार त्यांच्याकडे असणारी मोठ्या रकमेची कर्जबाकी ओटीएस योजनेच्या अंतर्गत भरून कर्ज खाते बंद करतील त्यांचा बँकेच्या वतीने सत्कार करण्यात येईल. बँकेची असणारी कर्ज थकबाकी लवकरात लवकर भरून बँकेस कर्जदाराने सहकार्य करावे. ३१ जुलै अखेर जास्तीत जास्त कर्जाची वसुली करून बँक पूर्व पदावर येणेकामी प्रशासक दिलीप तिजोरे व बँकेतील सर्व स्टाफ थकीत कर्जदारांच्या भेटी घेत आहेत; असेही तिजोरे यांनी सांगितले.

**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
उपलब्ध सुविधा.. मो.9423222266 9604762600
डोळ्याचा दवाखाना
डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमेट्री
- जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार • लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय

वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

तोच विश्वास, तीच सेवा
**आनंद** ड्रायफ्रुटस् & गरम मसाला
प्रोप्रा : अमोल र. हिरण मो.9270496867, 7057258385
• खास उन्हाळ्याकरीता...
थंडाई बोटल, ताक मसाला, कोकम सरबत, आवळा कॅंडी, वाळा सरबत, रसना, सब्जा बी, वाळा जुडी, रोझ सिरप, आईस्क्रिम पावडर, खडीसाखर, प्रवाळयुक्त गुलकंद, पापड आटा पापड मसाला, पापड खार, मोहरी डाळ, मेथी,लोणचे मसाले...
उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट
केक भांडी, चॉकलेट क्रंची, टर्निंग टेबल नोजल रशियन आईस्क्रिमचे सर्व साहित्य तसेच केक व वाढदिवस डेकोरेशन सजावट साहित्य मिळेल !
एकवेळ अवश्य भेट द्या..!
एच.यु.गुगळे कापड दुकान समोर, मेनरोड, करमाळा.

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी
२०० रू. भरून वर्षभर घरपोच अंक मिळवा !

# अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबीर संपन्न



करमाळा(सं.प्र.) : शासन आपल्या दारी अभियान अंतर्गत तालुक्यातील जास्तीत जास्त महिलांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महिला लोकशाही दिनाच्या धर्तीवर करमाळा येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर, नायब तहसीलदार विजय जाधव, गटविकास अधिकारी मनोज राऊत, पोलीस निरीक्षक ज्योतिराम गुंजवटे, भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे, बालविकास प्रकल्प अधिकारी व इतर अधिकारी उपस्थित होते.


समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या दृष्टीने महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी; यासाठी एक प्रभावी उपाय योजना म्हणून महिला व बालविकास विभाग मार्फत महिला लोकशाही दिन राज्य, विभाग, जिल्हा व तालुकास्तरावर राबविण्यात येतो. यामध्ये सर्व प्रशासकीय विभाग सहभागी होऊन समस्याग्रस्त महिलांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करणे हा या शिबीराचा मुख्य उद्देश होता. शिबीरात महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# झिरो वायरमन कर्मचाऱ्याचा वीजेच्या खांबावरून पडून मृत्यू

करमाळा(सं.प्र.) : साडे येथे सालगुडे वस्ती जवळ एका झिरो वायरमन कर्मचाऱ्याचा वीजेच्या खांबावरून पडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. यात हकीकत अशी की, गेल्या दोन ते तीन दिवसापूर्वी वादळी वाऱ्यासहीत साडे परिसरात काही ठिकारी पाऊस झाला होता. या वादळी वाऱ्याचा तडाखा वीजेच्या खांबांना बसून अनेन विजेच्या खांबावरील वायर तुटली होती. सदर तुटलेल्या वायरी जोडण्यासाठी साडे येथील पांडूरंग शंकर कदम (वय-५८) हे झिरो कर्मचारी वीजेच्या खांबावर चढले. तद्नंतर वीजेच्या प्रचंड प्रवाहामुळे ते खांबावरून खाली पडले. त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना सोलापूर येथे खाजगी दवाखान्यात उपचारासाठी नेले असता, त्यांची दोन दिवसांनी प्राणज्योत मालवली. पांडूरंग कदम यांचेवर साडे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले आहेत. साडे येथे सध्या नेमून दिलेले विद्युत वायरमन कर्मचारी कधीही वीजेच्या कामासाठी येत नसून नाईलाज म्हणून शेतकरी वर्गांना झिरो कर्मचाऱ्याकडून आपली वीजेची कामे पूर्ण करावी लागतात. सदरची घडलेली घटना ही वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे झाली असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले आहे.

# समाजकल्याणचे 'ब्रँड अंम्बेसिटर' म्हणून महेश वैद्य यांची निवड

करमाळा(सं.प्र.) : जनजागरण कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्ह्याच्या समाज कल्याण विभागाचे ब्रँड अंम्बेसिटर म्हणून करमाळा येथील महेश बबनराव वैद्य यांची निवड करण्यात आली आहे.या निवडीचे पत्र नुकतेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी दिले आहे. या पत्रात म्हटले,की नशामुक्त अभियान हे संपुर्ण देशात राबवले जाते. हे अभियान सोलापूर जिल्ह्यात पुर्ण कार्यक्षमतेने राबवण्यासाठी व जिल्ह्यात व्यसनमुक्ती करण्यासाठी आपली एका वर्षासाठी ब्रँड अंम्बेसिटर म्हणून नेमणूक करण्यात येत असल्याचे म्हटले आहे. श्री. वैद्य यांच्या निवडीनंतर त्यांचे अभिनंदन शहर व तालुक्यातील विविध संस्था व संस्थाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण


कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.

मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक किसरेकर मो.९४२३५३५४४२

प्रवेश सुरू... प्रवेश सुरू... प्रवेश सुरू...
१० वी, १२ वी पास/नापास मुली व महिलांकरीता आपल्या उज्वल भविष्यासाठी
१०० टक्के वैद्यकिय क्षेत्रात नोकरीची हमी देणारे नर्सिंग कोर्स !
Approved by Maharashtra State Government Regd No.NSK/0000571/2019
(ISO 9001 : 2015 CERTIFIED INSTITUTE)
अशोका नर्सिंग इन्स्टिट्यूट, करमाळा.
आदिवासी, ग्रामीण तसेच शहरी भागातील मुली, महिला व मुलांकरीता
नर्सिंगचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून देणारी एकमेव संस्था
ग्रामीण भागातील मुली व मुलांसाठी वैद्यकिय क्षेत्रात करीयर करण्यासाठी सुवर्णसंधी !
आजच आपला प्रवेश निश्चित करा !

| क्र. | कोर्सेस |
|---|---|
| 1 | A.N.M. |
| 2 | O.T.Assitant |
| 3 | DMLT |
| 4 | X-Ray Technician |

• शैक्षणिक पात्रता •
१० वी पास, १२ वी पास/नापास

आमची वैशिष्ट्ये..
• प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना मोफत राहण्याची सुविधा.
• प्रशिक्षण कालावधीत मुलींकरीता २००० रू. प्रति महिना व मुलांसाठी ३००० रू. प्रति महिना स्कॉलरशीप
ट्रेनिंग पूर्ण झाल्यानंतर खासगी हॉस्पिटलमध्ये १५ ते २० हजार रू. मासिक पेमेंटची हमी !
करमाळा शाखा : शिंदे हॉस्पिटल, डॉ.दयानंद शिंदे, बायपास रोड, शाहूनगर, करमाळा.
अधिक माहिती व नांवनोंदणीसाठी संपर्क करा (नाव नोंदणी : सकाळी ९ ते सायं. ६ पर्यंत)
8552935188, 9552771207, 9158200049

# मंडल अधिकाऱ्यास २५ हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडले

करमाळा(सं.प्र.) : उमरड येथील महसुल विभागात कार्यरत असलेल्या मंडल अधिकाऱ्यास २५ हजाराची लाच घेताना लाचलुचपत अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले आहे. यामध्ये करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला असून पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली आहे.

यात हकीकत अशी, की तक्रारदाराने वारस नोंदीसाठी अर्ज केला होता. यावर उमरड येथील मंडल अधिकारी यांनी तक्रारदाराला २५ हजाराची लाच मागितली. त्यानंतर तक्रारदाराने लाचलुचपत अधिकारी यांचेकडे तक्रार केली होती. त्यानुसार ही लाच जेऊर येथे असलेल्या मंडल अधिकारी कार्यालय येथे साकारताना संशयित आरोपीला पकडण्यात आले. या कारवाईसाठी पुणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधिक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधिक्षक शितल जानवे यांनी मार्गदर्शन केले. पर्यवेक्षण अधिकारी म्हणून सोलापूर येथील पोलीस उपअधिक्षक गणेश कुंभार यांनी काम पाहिले तर पोलीस अंमलदार स्वीमराव जाधव, पोलीस नाईक अतुल घाडगे, पोलीस कॉन्स्टेबल सलीम मुल्ला, शाम सुरवसे आदींनी सापळा लावून ही कारवाई केली आहे.

प्लॉट विकणे आहे
मुथानगर, करमाळा येथील नगरपालिका हद्दीतील
६० फूट रस्त्यालगत असलेली दोन गुंठे घरजागा योग्य किंमत
आल्यास त्वरीत विकणे आहे
संपर्क : मो.8805359422, 8975011555

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)



कंदरचे सरपंच भास्करराव भांगे यांचा वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन सत्कार करताना वाशिंबेचे सरपंच तानाजीबापू झोळ, नानासाहेब लोकरे, महावीर साळुंके



दहावीच्या म.गांधी विद्यालयातील विद्यार्थीनी केतकी गणेश कोरपे हिचा विद्यालयात प्रथम क्रमांक आल्याबद्दल सत्कार प्रसंगी प्राचार्य पोपट कापले पर्यवेक्षक बी.के.पाटील व पालक गणेश कोरपे




सेवानिवृत्त सहाय्यक फौजदार

**मा.श्री.कांतीलाल गोविंद जगताप**

हे दि.१ जून २०२३ रोजी ८३ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. त्यांना वाढदिवसानिमित्त आमच्याकडून..**हार्दिक शुभेच्छा !**

शुभेच्छुक

पत्नी.. सौ.गोपिका कांतीलाल जगताप (सेवानिवृत्त शिक्षिका)


जावई.. श्री.संतोष रामचंद्र कांबळे (प्रोफेसर) श्री.सुभाष पांडूरंग भोसले(समाजकल्याण अधिक्षक)
श्री.संतोष केरबा गायकवाड(डॉक्टर) श्री.अतुल लाला खरात (जि.प.सदस्य) पीएच.डी

मुली.. सौ.वैशाली संतोष कांबळे (शिक्षिका) सौ.रूपाली सुभाष भोसले
सौ.दिपाली संतोष गायकवाड (डॉक्टर) सौ.पल्लवी अतुल खरात

नातू.. चि.हरशू,आदित्य, आरूष, दिदी, स्वीटी

न्यु.**संगम स्वीटस्**

प्रोप्रा : एस.पी.चुंग
मो.9860670816



- काजू कतली
- रसमलई
- काजू रोल
- बंगाली मिठाई
- काजू वाटी
- बासुंदी
- काला जामुन
- मलई जामुन

सर्व प्रकारची मिठाई व नमकीन मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण !

**पंजाब वरताद चौक, करमाळा., जि.सोलापूर**



सस्नेह निमंत्रण

॥ श्री गजानन प्रसन्न ॥ श्री आदिनाथ प्रसन्न ॥
स.न.वि.वि. आमचे येथे श्री कमलाई कृपेकरून...

**चि.शंभुराजे**

देशभक्त कै.नामदेवराव महादेवराव जगताप (माजी आमदार) यांचे नातू व श्री.जयवंतराव नामदेवराव जगताप (माजी आमदार) रा.करमाळा यांचे सुपुत्र

**चि.सौ.कां.प्राजक्ता**

कै.साहेबराव नरसिंग भोसले यांची नात व श्री.सुरेश साहेबराव भोसले रा.सरकोली, ता.पंढरपूर यांची सुकन्या

यांच्या शुभविवाह प्रित्यर्थ

**स्वागत समारंभ**

गुरूवार दि.८/६/२०२३ रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत करण्याचे योजिले आहे. तरी आपली सहकुटूंब सहपरिवार उपस्थिती प्रार्थनीय आहे.

• आपले नम्र •

श्री.जयवंतराव नामदेवराव जगताप (माजी आमदार)
सौ.नंदिनीदेवी जयवंतराव जगताप

समस्त जगताप परिवार

कार्यस्थळ

**राधेश्याम सुंदर मंगल कार्यालय**
इंद्रा लॉन्स, झरे फाटा
ता.करमाळा, जि.सोलापूर

प्रिती भोजन : गुरूवार दि.८/६/२०२३ रोजी सायं.६ ते ९

टीप : सर्वांना निमंत्रण पत्रिका दिलेल्या आहेतच. नजरचुकीने कोणास निमंत्रण पत्रिका मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून शुभविवाह प्रित्यर्थ आयोजित स्वागत समारंभास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे..!


विकासप्रिय आमदार
कंदर ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच
मा.श्री.भास्करराव भांगे
यांना वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
तानाजी(बापू) झोळ मित्र मंडळ
करमाळा तालुका

## खा.नाईकनिंबाळकर यांचेकडून पोंधवडी-वंजारवाडी चारीच्या कामाची पाहणी



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील पोंधवडी-वंजारवाडी चारीच्या कामाची पाहणी खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांनी केली. या चारीचे काम गेल्या वीस वर्षापासून चालू होते. या चारीच्या कामासाठी खासदार नाईकनिंबाळकर यांनी पाठपुरावा केला होता. यावेळी खासदार नाईक-निंबाळकर म्हणाले, की ३१ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीमध्ये या कामासाठी निधी देण्याचे ठरले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे मार्चमध्ये या कामाला ६० कोटी रुपये निधी मंजूर झाला. हे काम पूर्ण झाल्याने लवकरच तालुक्यातील ५ हजार हेक्टर क्षेत्र ओलिता-खाली येणार आहे.

विहाळ परिसरातून भैरवनाथ कारखान्यावर जाणाऱ्या मार्गावर येळे वस्ती येथून पोंधवडीला गेलेल्या या चारीत कुकडीचे पाणी सोडण्याचे नियोजन आहे. अनेक वर्षाची प्रतिक्षा केल्यानंतर या चारीचे काम पूर्ण झाल्यामुळे परिसरातील शेतकरी वर्गाकडून समाधान व्यक्त केले जात आहे. या पाहणी दौऱ्यावेळी भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे, महाराष्ट्र चॅम्पीयन पै.अफसर जाधव, बाळासाहेब कुंभार, वाशिंबेचे उपसरपंच अमोल पवार, जयंत काळे-पाटील, गणेश गोसावी, सरपंच काकासाो सरडे यांच्यासह परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

## योध्दा अकॅडमी मधील तब्बल ४१ विद्यार्थी पोलीस भरती

करमाळा(सं.प्र.) : सुभेदार मेजर विलास नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली झरे व जेऊर येथे सुरू असलेल्या नाईकनवरे बंधूच्या योध्दा अकॅडमी मधील तब्बल ४१ विद्यार्थी पोलीस भरतीमध्ये यशस्वी झाले आहेत. यावर्षीच्या पोलीस भरती प्रक्रियेमध्ये करमाळा तालुक्याच्या विविध भागातील अनेक तरूणांनी पोलीस भरतीमध्ये यशस्वी होऊन यश संपादन केले आहे.

याबाबत बोलताना श्री.नाईकनवरे म्हणाले, की करमाळा तालुक्यात बारावी ते पदवीपर्यंतचे शिक्षण झालेले अनेक बेरोजगार तरूण गेल्या सात-आठ वर्षापासून स्थानिक पोलीस भरती मार्गदर्शन केंद्र व स्वत:च्या घरीच राहून पोलीस भरतीचा सराव करत होते. यामध्ये अनेकांची घरची परिस्थिती साधारण असल्याने कोणत्याही स्थितीत यशस्वी होणे गरजेचे होते. अशा सुशिक्षित बेरोजगार तरूणांसाठी गेल्या काही वर्षापासून पोलीस भरतीचा पर्याय दिलासादायक ठरत होता. परंतू वेगवेगळ्या कारणांनी भरती प्रक्रिया पुढे ढकलण्याचे प्रकार होत होते. त्यामुळे हे युवक निराशेच्या गर्दीत जाऊ लागले होते. परंतु यावर्षी सरकारने घेतलेल्या धाडसी निर्णयाने सर्वच जिल्हा व शहर कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर पोलीस दलामध्ये भरती प्रक्रिया राबवण्यात आली. यामध्ये तालुक्यातील योध्दा पोलीस भरती प्रशिक्षण केंद्रातील ४१ विद्यार्थी यशस्वी ठरले आहेत. करमाळा तालुक्यातील ३१ व तालुका बाहेरील १० असे एकूण ४१ विद्यार्थी भरती झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अकॅडमीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.




**जमीन विकणे आहे**

मौजे खांबेवाडी येथील अंदाजे २५ एकर जमीन योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.

संपर्क

मो.9423325831, 9881589831, 9420648765

## केम येथे शिवलिंगाची पुर्नप्राणप्रतिष्ठापना सोहळा संपन्न



करमाळा (सं.प्र.) : केम येथील जागृत ग्रामदैवत श्री उत्तरेश्वर देवस्थानच्या ९०० वर्ष परंपरा लाभलेल्या शिवलिंगास वज्रलेप करून शिवलिंगाची पुर्नप्राणप्रतिष्ठापना सोहळा नुकताच उत्साहात संपन्न झाला. शिवलिंगास व्रजलेप करण्यासाठी २० दिवस मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद करण्यात आले होते. गुरूपुष्प मुहूर्तावर मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम करून मंदिर खुले केले. यामध्ये सकाळी गावातून जलदिंडी काढण्यात आली. या दिंडीचे पूजन भैरू शिंदे व त्यांच्या पत्नी पुष्पा शिंदे यांचे हस्ते करून दिंडीची सुरुवात श्री विठ्ठल मंदिरातून झाली. यावेळी गावातील प्रमुख मार्गावरून दिंडी उत्तरेश्वर मंदिरात पोहोचली. यावेळी गावातील हजारो महिला दिंडीत सहभागी झाल्या होत्या. दिंडी उत्तरेश्वर मंदिर येथे आल्यानंतर महिलांनी व पुरूषांनी फुगड्या खेळल्या. सकाळी श्री स लघुरूद्राभिषेक, होमहवन इ. धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी श्री उत्तरेश्वर देवस्थाचे महंत जयंतगिरी महाराज यांचेसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रात्री ह.भ.प.बोधले महाराज यांचे किर्तन झाले.

## कोंढेजचे सुपुत्र शिवाजी ननवरे यांनी केले माऊंट एव्हरेस्ट शिखर सर



करमाळा(सं.प्र.) : कोंढेज गावचे सुपुत्र व सध्या पुणे ग्रामीण पोलीस दलातील स्थानिक गुन्हे शाखेमध्ये (लोणी काळभोर) येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक शिवाजी ननवरे यांनी जगातील सर्वात उंच असलेले माऊंट एव्हरेस्ट शिखर सर केले आहे. १७ मे रोजी सकाळी साडेअकरा वाजता माऊंट एव्हरेस्ट शिखरावर पोहोचल्यावर त्यांनी भारताचा तिरंगा ध्वज फडकवला. त्यांच्या या कामगिरीचे कोंढेजसह करमाळा तालुक्यातील नागरीकांनी कौतूक केले आहे. नेपाळ-चीन समीवर असलेल्या हिमालय पर्वतातील हे शिखर ८८४८.८६ मीटर उंचीचे आहे. माऊंट एव्हरेस्ट सर करण्यासाठी शारिरीक क्षमतेबरोबरच मानसिक क्षमता देखील असणे आवश्यक आहे. उंच ठिकाणामुळे हवेतील तसेच शरीरातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी असते. त्यामुळे साधारण चालताना देखील शरीराची दमछाक होते. परंतु जिद्द आणि आत्मविश्वास असणारे ट्रेकर्सच नेहमी यशस्वी होतात. असाच आत्मविश्वास ठेवून कोंढेज येथील शिवाजी ननवरे यांनी माऊंट एव्हरेस्ट शिखर सर केले.

## एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत अजिंक्य तकीक जिल्ह्यात द्वितीय



करमाळा(सं.प्र.) : राज्यस्तरीय एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत वांगी नं.२ येथील अजिंक्य नितीन तकीक याचा जिल्ह्यातून दुसरा क्रमांक मिळवून यश संपादन केले आहे. अजिंक्य हा जिल्हा परिषद शाळा वांगी नं.२ चा विद्यार्थी असून त्याने २६ मार्च २०२३ रोजी ही परीक्षा दिली. यामध्ये अजिंक्य यास ३०० पैकी २६६ गुण मिळवून जिल्ह्यात दुसरा तर तालुक्यात प्रथम क्रमांक आला आहे.

# ठरवून नियोजन व अभ्यास केल्यास यश मिळते : डॉ.शुभांगी पोटे-केकान



करमाळा(सं.प्र.) : ठरवून नियोजन व अभ्यास केल्यास कोणत्याही क्षेत्रात यश मिळते. त्यासाठी प्रत्येकांनी ध्येय ठरवून कामाला लागावे; असे आवाहन आयएएस परीक्षेत करमाळ्याचे नाव उज्वल करणाऱ्या पहिल्या युवती डॉ.शुभांगी पोटे-केकान यांनी केले.

करमाळा येथील यशकल्याणी संस्था, ग्रामसुधार समिती, ज्ञानज्योती महिला संस्था, वंजारी महासंघ, अंधश्रध्दा निर्मुलन समिती, क्षीतिज ग्रुप यासह अन्य सामाजिक संस्थांच्या वतीने डॉ.पोटे-केकान यांचा सन्मान सोहळा यशकल्याणी भवन मध्ये आयोजित केला होता. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ.पोटे-केकान बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष ॲड.डॉ.बाबूराव हिरडे हे होते. पुढे बोलताना डॉ.पोटे-केकान म्हणाल्या, की माझी निवड झाल्यानंतर अनेक विवाहित महिलांचे फोन आले. विवाहानंतरही यश मिळू शकते, याचा त्यांना आनंद झाला आहे. खरंतर योग्यप्रकारे प्रयत्न केलेतर यश मिळत असते. मी कोणत्याही क्लाशिवाय यश मिळवले. मला माझ्या परिवाराने दिलेले पाठबळ व सहकार्य यामुळे इथपर्यंत पोहोचले. माझे पती यांनी केलेले मार्गदर्शन व दिलेली साथ मला महत्वाची ठरली आहे.पालकांनी मुलावर आपले विचार न लादता, त्यांच्या आवडीला प्रोत्साहन द्यावे; असेही डॉ.पोटे-केकान यांनी सांगितले.

यावेळी यशकल्याणी संस्थेच्या वतीने शाल, भक्तीशक्तीची प्रतिमा, मानपत्र व गुलाबाचा हार देऊन डॉ.पोटे-केकान यांचा विशेष सन्मान केला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख, मुख्याध्यापिका शितल वाघमारे, प्राचार्य डॉ.प्रविण देशमुख, तहसीलदार विजय जाधव, आजी-माजी सैनिक संघटनेचे तालुका अध्यक्ष अक्रूर शिंदे, ॲड.बाबूराव हिरडे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.विष्णू शिंदे यांनी केले. स्वागतगीत शिक्षक लष्कर यांनी गायिले. उपस्थितांचे आभार प्रा.प्रदीप मोहिते यांनी मानले. यानंतर विविध व्यक्ती व संस्थे मार्फत डॉ.शुभांगी पोटे-केकान यांचा सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सयाजीराजे ओंभासे, अनिल माने, दादासाहेब पिसे, संतोष माने, बाळासाहेब दुधे, गजेंद्र पोळ, प्रशांत नाईकनवरे, दोस्ती बॅन्डचे कुरेशी, प्रफुल्ल दामोदरे, पांडे येथील हलगी पथक भिवा वाघमोडे, विक्रम राऊत, शहाजी मोहोळकर, नवनाथ मोहोळकर, तात्यासाहेब ढाणे, रशिदभाई बागवान, सुरताल संगीत विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नरारे, बोधे गुरूजी, प्राचार्य संभाजी जगताप, ग्रामविकास अधिकारी स्वाती माने, सचिन काळे, नागादादा केकान, हनुमंत सरडे, अजित कणसे, संतोष शितोळे, प्रा.जयेश पवार, अनिल बदे, ज्ञानज्योती महिला ग्रुपच्या अनिताताई राऊत, निशिगंधा शेंडे यांचे योगदान लाभले.

> करमाळ्याच्या प्रगतीचा आलेख उंचावर नेण्याचे काम डॉ.शुभांगी पोटे-केकान यांनी केले आहे. तालुक्यातील पहिल्या महिला आयएएस होण्याचा मान त्यांनी मिळवला आहे. पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीला त्यांचा सत्कार करताना आम्हांस आनंद होत आहे. त्यांचे यश हे पुढील पिढीला प्रेरणादायी ठरणार आहे. आज विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहिल्याने त्यांचे कर्तृत्व सिध्द होत आहे.
> **...गणेश करे-पाटील**
> **(अध्यक्ष, यशकल्याणी संस्था)**

# अहिल्याबाई होळकर हिंदुस्थानचा स्वाभिमान : महेश चिवटे



करमाळा (सं.प्र.) : अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या कृतीतून स्वाभिमानाने जगण्याची प्रत्येक स्त्रीला हिंमत दिली. प्रत्येक व्यक्तीने अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र वाचलेतर खऱ्या अर्थाने प्रत्येकाच्या जीवनात सुध्दा मार्ग बदल होऊ शकतो; असे मत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी व्यक्त केले.

करमाळा शिवसेनेचे मुख्य कार्यालयात अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. अहिल्याबाई होळकर यांचे प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ पत्रकार नासीर कबीर यांचे हस्ते झाले. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख निखिल चांदगुडे, तालुकाप्रमुख राहुल कानगुडे, बळीराजा शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष आण्णा सुपनवर, वस्ताद आजिनाथ कोळेकर, हिवरवाडीचे सरपंच राजेंद्र मेरगळ, जयवंतराव जगताप युवा मंचचे तालुका अध्यक्ष जयराज चिवटे, देवळालीचे चंद्रकांत चव्हाण, मारूती भोसले, निलेश चव्हाण, आजिनाथ इरकर उपस्थित होते.

# पाथुर्डी येथे अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

## कर्तृत्ववान महिलांचा पुरस्कार देऊन सन्मान



करमाळा (सं.प्र.): पाथुर्डी येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन सरपंच रूक्मीणी मोटे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी पाथुर्डी ग्रामपंचायत मार्फत महिला व बालविकास क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सरपंच रूक्मीणी मोटे यांचे हस्ते वर्षाराणी मोटे व सुमन नाळे यांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमावेळी पत्रकार शितलकुमार मोटे, मुख्याध्यापक महेश कांबळे, ग्रामसेवक महेश काळे, वर्षाराणी मोटे, सुमनताई नाळे यांनी मनोगत व्यक्त केले. सरपंच रूक्मीणी मोटे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी पुरस्कार प्राप्त वर्षाराणी मोये व सुमन नाळे यांनी मिळालेली पुरस्काराची रक्कम जिल्हापरिषद शाळेतील मुलांच्या खर्चासाठी देण्यात आली.

या कार्यक्रमास सरपंच रूक्मीणी मोटे, उपसरपंच प्रकाश खरात, ग्रामसेवक महेश काळे, ग्रामपंचायत सदस्या आशा तोडेकर, अश्विनी मोटे, सुनंदा मोटे, सचिन चांगण, चांगदेव कानडे, विकास मोटे, चांगदेव मोटे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शितलकुमार मोटे, धनंजय मोटे, शिवाजी पाडुळे,शिपाई दिपक मोटे, वि.का.सोसा.चे चेअरमन वैजिनाथ मोटे, अतुल मोटे, अनिकेत मोटे, राहुल मोटे, दादा लगस, बंटी मोटे, समाधान मोटे, दादा जानकर, गोकुळ मोटे, अंगणवाडी सेविका पुष्पा कोरे, आशा स्वयंसेविका भागुबाई हुगले, दिपाली खरात, सुनिता गोरे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मीनाताई मोटे, मुख्याध्यापक महेश कांबळे, नाना कांबळे, नागनाथ कोरे यांचेसह विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा मो.9172092187
होलसेल साडी डेपो
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
साड्यांचा भरपूर स्टॉक व
भरपूर व्हरायटीमध्ये उपलब्ध !
घरगुती विक्रीसाठी साड्या होलसेल दरात मिळतील
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.

ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186

# मांगी तलाव लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांचा पुणे येथील हेलपाटा वाया जाऊ देणार नाही : खा.रणजितसिंह नाईकनिंबाळकर



करमाळा(सं.प्र.): मांगी तलाव कुकडी लाभ क्षेत्रात समाविष्ट करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांचे नेतृत्वाखाली १ जून रोजी पुणे येथील शासकीय विश्रामगृहात माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांचेबरोबर मांगी तलाव लाभ क्षेत्रावरील शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी खा.नाईकनिंबाळकर म्हणाले, की मांगी तलावाचा प्रश्न घेऊन मला भेटण्यासाठी पुणे येथे आलेल्या शेतकऱ्यांचा हेलपाटा मी वाया जाऊ देणार नाही. मांगी तलावाचा समावेश कुकडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात करण्यासाठी सिंचन भवन येथे बैठक लावून हा प्रश्न मार्गी लावणार आहे. पाण्याबाबत शेतकऱ्यांची तळमळ मला माहिती असल्यामुळे हा प्रश्न मी हाती घेतलेला असून लवकरात लवकर मार्गी लावणार असल्याचे वचन खा.नाईकनिंबाळकर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिले.याप्रसंगी भाजपाचे तालुका अध्यक्षगणेश चिवटे, रावगावचे माजी सरपंच विलास बरडे, पोथरेचे सरपंच धनंजय झिंजाडे, माजी सरपंच विष्णु रंदवे, वडगावचे सरपंच लहु काळे, शिवशंकर जगदाळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व सुत्रसंचालन संजय घोरपडे यांनी केले. यावेळी मकाईचे माजी संचालक हरिभाऊ झिंजाडे, आदिनाथचे माजी संचालक विठ्ठल शिंदे, बिटरगावचे सरपंच अभिजीत मुरुमकर, जातेगावचे सरपंच छगन ससासणे, करंजेचे सरपंच काका सरडे, लिंबेवाडीचे सरपंच किरण फुंदे तसेच अमोल पवार, मोहन शिंदे, बाळासाहेब होसिंग, दासा बापू बरडे यांचेसह भाजपाचे पदाधिकारी व शेतकरी बांधव उपस्थित होते.

# शेलगाव(क) येथे कर्तृत्ववान महिलांचा अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सन्मान

करमाळा(सं.प्र.) : शेलगाव(क) येथील कविता सुनील वीर व जयश्री पांडुरंग काटूळे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. शेलगाव(क) ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभागाच्या वतीने हे पुरस्कार वितरीत करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने यावर्षी पासून ग्रामपंचायतस्तरीय पुरस्काराचे वितरण करण्यास प्रारंभ झालेला आहे. प्रशस्तीपत्र, ट्रॉफी, पुष्पहार, शाल व पाचशे रूपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते. महिला व बालविकास, शिक्षण, आरोग्य जनजागृती या विषयांमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल गावातील महिलांचे अर्ज मागविण्यात आलेले होते. त्यामधून महिला बचत गटांचे जाळे निर्माण करणाऱ्या कविता वीर व कोविडा योध्दा म्हणून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जयश्री काटूळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास सरपंच अशोक काटुळे, उपसरपंच सचिन वीर, आत्माराम वीर, राहुल कुकडे, ग्रामसेवक खाडे, राजाराम वीर, आनंद वीर, संदिप पाटील, मुकूंद कुकडे, बाळनाथ वीर, करूणा बनसोडे, गंगा काटुळे, त्रिशला वीर, मीना वीर, सारीका वीर, पद्मीनी वीर, गंधारबाई वीर, भीमाबाई वीर, सीमा जाधव, पायल वीर, प्रतिभा पाटील, छाया वीर,अलका वीर, अनिता वीर, शालन वीर, कुसूम वीर, मिनाक्षी वीर, सविता सपाटे, मनीषा सपाटे, संगीता सपाटे, तारामती वाघमारे, आदी महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

# वांगी नं.३ येथे अहिल्याबाई होळकर महिला पुरस्कार देऊन महिलांचा गौरव



करमाळा (सं.प्र.) : पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची २९८ वी जयंती ग्रामपंचायतीच्या वतीने वांगी नं.३ येथे साजरी करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील कर्तृत्ववान महिलांचा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन ग्रामपंचायत सदस्या रोहिणी सोमनाथ रोकडे व निता सोमनाथ खराडे यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन सरडे यांनी केले. यावेळी ग्रा.पं.सदस्य सोमनाथ रोकडे व सोमनाथ खराडे यांनी आपल्या भाषणातून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा संपूर्ण इतिहासच उलगडून सांगितला. यावेळी वांगी नं.३ येथील कर्तृत्वान महिला निता सोमनाथ खराडे, कल्याण संजय सोनवणे, स्वाती सचिन कळसाईत यांचा अहिल्याबाई होळकर महिला सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सरपंच मयुर रोकडे, उपसरपंच संतोष कांबळे, राहुल रोकडे, कावरे मॅडम, सुवर्णा बेंद्रे, साळुंखे मॅडम, चिवटे मॅडम यांचेसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपस्थितांचे आभार डॉ.विक्रम बेंद्रे यांनी मानले.

# वाद मिटविण्यासाठी गेलेल्यास तिघांकडून मारहाण

करमाळा(सं.प्र.) : वाद मिटविण्यासाठी गेलेल्या तरूणास तिघाजणांनी लोखंडी गजाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले आहे. हा प्रकार तरटगाव येथे २८ मे ला सायंकाळी साडेआठच्या सुमारास घडला आहे. याप्रकरणी रामचंद्र भिवाजी जाधव (रा.तरटगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की शैलेश घाडगे याने गावातील एका महिलेस काहीतरी सांगून भांडण लावले होते. त्यामुळे मी त्याच्या घरी रात्री साडेआठ वाजता गेलो व अशी भांडणे लावू नको असे समजावून सांगितले असता तेथील शेखर संजय घाडगे, शैलेश संजय घाडगे व कल्पना संजय घाडगे या तिघांनी लोखंडी गजाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून मला जखमी केले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# मोटारसायकल चालकास अज्ञात वाहनाची धडक - मोटारसायकल चालकाचे निधन

करमाळा : रात्रीच्या अंधारात मोटारसायकल चालवत असताना अज्ञात वाहनाने धडक देऊन झालेल्या अपघातात ५० वर्षाच्या प्रौढाचे जागीच निधन झाले आहे. हा अपघात १ एप्रिलला पहाटे दोन ते तीन च्या दरम्यान केम – जेऊर रस्त्यावर घडलेला आहे. या प्रकरणी पोपट सदाशिव कारंडे (रा.भिमनगर, माढा) यांनी २९ मे २०२३ रोजी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझा भारत सदाशिव कारंडे (वय-५०, रा.माढा) हा मोटारसायकलवरून केम येथून जेऊरकडे जात असताना त्याच्या मोटारसायकलला अज्ञात वाहनाने धडक देवून झालेल्या अपघातात त्याचे निधन झाले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.


ओजस हॉस्पिटल
OJS HOSPITAL
AlOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ * २४ तास अत्यावश्यक सेवा
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार M.sc. Biotech, Health & Nutritionआहारतज्ञ
ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार • हृदयरोग व उच्च रक्तदाब • मधुमेह • थायरॉईड • संधिवात • पोटाचे आजार • स्त्रियांचे आजार • श्वसनसंस्थेचे आजार • मणक्यांचे व हाडांचे विकार • मुतखडा • मुळव्याध • सौंदर्य समस्या • त्वचारोग व केशविकार • आहारविषयक मार्गदर्शन..
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा) Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत) PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test (गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. • संपर्क : मो.9960334005, 9423333950



चला.. चला.. वर्षा बॅग ॲन्ड शुज सेंटरमध्ये चला.. आणि मिळवा भव्य सुट !
प्रोप्रा : बाळासाहेब कांबळे मो.9960077098 मो.7219818417
'विश्वास' हीच आमची परंपरा..!
वर्षा बॅग ॲन्ड शुज सेंटर
शालेय पाठ्यपुस्तकावर मिळवा भव्य सुट
स्कुल बॅग, कॉलेज सॅक, प्रवासी बॅग बेल्ट इ. तसेच चप्पल, सॅन्डल व स्पार्क, बाटा अशा ब्रॅन्डेड कंपनीचे शुज्,सॅन्डल इ. आता सर्व काही फक्त एकाच ठिकाणी खरेदी करा !

पत्ता : करमाळा बस स्टॅन्डच्या अगदी समोर, जेऊर रोड, करमाळा.

# कोल्हाटी समाजातील मुलांच्या वसतिगृहाचे झाले काय..?

नेरले येथे कोल्हाटी समाजातील लहान मुलांच्या शिक्षणासाठी 'भारतमाता वसतिगृह' सुरू केले होते. तीन वर्षानंतर हे वसतिगृह चक्क बंद झाले असून त्यावर कोणीही विचार केला नाही व त्याबाबत पाठपुरावा सुध्दा झालेला नाही.

कोल्हाटी समाजातील तरूण महिला कामाच्या निमित्ताने आपल्या लहान मुलांना नातेवाईकांच्या ताब्यात देऊन बाहेरगावी जात असतात. त्यामुळे या मुलांचे भवितव्य अंधारातच रहाते. या मुलांना भविष्य घडवता यावे, यासाठी पुणे येथील भटके विमुक्त विकास परिषदेव्दारे नेरले येथे वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेतला होता. तत्कालीन भटक्या विमुक्त परिषदेचे अध्यक्ष दादा इदाते, संघटनमंत्री गिरीश प्रभुणे, कार्यवाह यशवंत ठकार यांनी असे वसतिगृह उभा करण्यास मान्यता दिली. त्यानंतर त्या वसतिगृहाचा शुभारंभ २४ जुलै २००२ रोजी नेरले येथे झाला. त्यावेळी नेरले व वडगाव येथे शाळेत जात असलेल्या पहिली ते सातवीच्या वर्गातील १२ मुले व १२ मुली यांना या वसतिगृहात प्रवेश देण्यात आला होता. त्यावेळी नेरले येथील कांचनबाई काळे यांनी स्वत:ची जागा वसतिगृहा साठी तसेच वीजही मोफत दिली होती. त्या मुलांच्या जेवणासाठी अन्नधान्याकरिता बाळासाहेब काळे, जालींदर काळे-पाटील, विठ्ठल काळे आदींनी सहकार्य केले होते. तर भटक्या विमुक्त विकास परिषदेकडून अन्य सर्व वस्तू पुरवल्या जात होत्या. त्यावेळी याच गावातील शशीकांत काळे व बालाजी शाहूराव काळे हे दोघे युवक विनामानधन वसतिगृह चालवत होते तर महिला नियंत्रक म्हणून यमगरवाडीच्या महादेवी भोसल्या या ही विनामानधन काम करत होत्या. या मुलांना अभ्यासा-बरोबरच व्यायाम, प्रात:स्मरण, संस्कार कथा सांगून सुस्कृंत बनवण्याचे प्रयत्न सुरू होते.

**आठवा जुन्या घटनांचा**

असे हे वसतिगृह चांगल्याप्रकारे सुरू होते. राज्यात कोल्हाटी महिलांच्या मुलासाठी उभारलेले हे पहिलेच वसतिगृह होते. असे असताना तीन वर्षानंतर हळूहळू ते एकदम बंद पडले. याला जबाबदार कोण..? या बंद पडलेल्या वसतिगृहाची चौकशी कोणीच कशी केली नाही..? राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रणालीतून सुरू असलेल्या व देशात सन २०१४ पासून संघ विचार प्रणित केंद्रात सरकार असतानाही या वसतिगृहाची कोणालाच कशी आठवण झाली नाही ?हा खरा प्रश्न आहे. आमच्या मुलांचेच नशीब फुटके म्हणून हे वसतिगृह बंद पडले व पुन्हा सुरू झाले नाही, अशी प्रतिक्रिया येथील कोल्हाटी समाजातील एका मातेने व्यक्त केली आहे.

# स्कार्पिओची लहान मुलास धडक - मुलगा गंभीर जखमी

करमाळा : स्कार्पिओ वाहनाने रस्त्यावरील मुलास धडक दिल्याने हा सात वर्षाचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे.हा प्रकार सालसे येथे ३० मे ला दुपारी दोन वाजता घडला आहे. या प्रकरणी लक्ष्मीबाई शंकर काळे (रा.सालसे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ३० मे ला दुपारी दोन वाजता मी व माझा नातू कार्तिक सुनील काळे (वय-६०) असे रस्त्याला उभे असताना स्कार्पिओ गाडी क्र.एमएच ४५ एन ९३५५ या गाडीवरील चालक सुदर्शन रघुनाथ शिंदे (रा.अकलुज रोड, इंदापूर) याने निष्काळजीपणे गाडी चालवून माझ्या नातवास धडक देऊन त्यास गंभीर जखमी केले आहे. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे.




# जिंती प्राथमिक आरोग्य केंद्र उद्घाटनाच्या प्रतिक्षेत

## साडेपाच कोटीची इमारत अडकली लालफितीत





करमाळा (सं.प्र.) : जिंती येथे आरोग्य विभागाने बांधलेली साडेपाच कोटी रूपये खर्चाची इमारत प्रशासनाच्या लालफितीत अडकली आहे.ही इमारत उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असल्याने याभागातील रूग्णांची मोठी गैरसोय होत आहे. या इमारतीचे उध् घाटन होत नसल्याने या भागातील रूग्णांना आयुर्वेद दवाखान्याच्या उपचारावरच अवलंबून रहावे लागत आहे. शासनाने आरोग्य केंद्राच्या या इमारतीचा शुभारंभ तातडीने करावा, अशी या भागातील नागरिकांची मागणी आहे.

जिंती येथे प्राथमिक आरोग्य केंद्र होण्यासाठी या भागातील अनेक नागरिकांची मागणी होती. त्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. विशेष म्हणजे जिल्हा परिषद सदस्या सौ. सवितादेवी राजेभोसले यांनी प्रयत्न तर केलेच पण स्वत:च्या मालकीची एक एकर जमीन या रूग्णालयाच्या इमारतीसाठी बक्षीसपत्र करून दिली आहे. अनेक पाठपुराव्यानंतर येथे पाच कोटी २५ लाख रूपये खर्च करून भव्य इमारत उभी होवून काही महिने झाले पण केवळ उद् घाटन राहिले आहे. त्यामुळे या दवाखान्यातून मिळणाऱ्या बाह्यरूग्ण उपचार, अंतररूग्ण उपचार, रक्त तपासणी, प्रसूती विभाग, डोळ्यावरील उपचार, तातडीची सेवा,१०८ ॲम्ब्युलन्स सेवा,साप चावल्यानंतर तातडीचे उपचार अशा सेवा मिळत नाही. सध्या येथील आयुर्वेद दवाखान्यावर मोठा ताण पडत आहे. दरमहा १२०० रूग्णावर उपचार केले जातात. तिथे कर्मचारी मर्यादीत आहेत. अशा स्थितीत जिंती येथील नव्याने बांधलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीचा शुभारंभ तातडीने करण्यात यावा व येथे डॉक्टरसह अन्य कर्मचारी तात्काळ नेमावेत अशी या भागातील नागरिकांची मागणी आहे.

# आंतरराष्ट्रीय सोमी संघटनेच्या परिषदेसाठी रोहिणी नगरे यांची निवड



करमाळा(सं.प्र.) : येथील रहिवाशी असलेल्या व सोमी संघटनेच्या जनरल सेक्रेटरी सौ.रोहिणी महेंद्र नगरे यांची आंतरराष्ट्रीय सोमी संघटनेची परिषद बाली(इंडोनेशिया) येथे ११ जून ते १४ जून या कालावधीत होत आहे. या परिषदेसाठी निरीक्षक म्हणून सौ.नगरे यांची निवड झाली आहे.

परिचर्या क्षेत्रातही वैद्यकिय क्षेत्र प्रमाणे विविध स्पेशालिटीज् आहेत. यामध्ये प्रसुतिपूर्व, प्रसुति आणि प्रसुतिनंतरच्या सेवा देणाऱ्या परिचारीकांना मिडवाईफ असे संबोधले जाते. अशा परिचारिकांच्या देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यावसायिक संघटना आहेत. आपल्या देशातील या संघटनेस सोमी असे म्हणतात. या संघटनेचे दर तीन वर्षातून एकदा परिषद आयोजित केली जाते. यावर्षी ही परिषद इंडोनेशियातील बाली येथे आयोजित केली आहे. या परिषदेला सौ.नगरे यांची निरीक्षक म्हणून निवड झाली आहे. त्या ५ जूनला जाणार आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल ग्रामसुधार समिती, यशकल्याणी संस्था तसेच अंधश्रध्दा निर्मुलन समिती यांचे वतीने विशेष अभिनंदन करण्यात आले आहे.

# जागतिक स्पर्धेसाठी वृषाली सालगुडे-पारकर यांची निवड



करमाळा : जागतिक स्तरावरील इंडिया वर्ल्ड वाईड - २०२३ सिझन१२ या स्पर्धेत १२० प्रतिस्पर्धी महिलामधून वृषाली अभिमन्यू सालगुडे (वृषाली धिरज पारकर) यांची निवड झाली आहे. सौ.वृषाली या सालसे येथील अभिमन्यु सालगुडे यांच्या कन्या आहेत. त्या स्वत: अभियंता असून एमबीए पर्यंतचे शिक्षण झाले आहे. आपला व्यवसाय सांभाळून त्या आपला छंदही जोपासत आहेत. त्यांची हाटमोंड या प्लाटफार्मवरून जागतिक स्तरावर इंडिया वर्ल्ड वाईडसाठी निवड झाली आहे. त्यांची अंतिम स्पर्धा ९ जून ला दुबई येथे होणार आहे. त्यांच्या या स्पर्धेसाठी करमाळा येथील ग्रामसुधार समितीच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# हार्दिक अभिनंदन


चि.आदित्य जयंत भांगे


कु.आदिती जयंत भांगे

गुरूकुल पब्लिक स्कुलचा विद्यार्थी **चि.आदित्य जयंत भांगे** (इ.३री) याने भारतीय अभिरूप परीक्षा(आय.ए.एस) सातारा परीक्षेत ३०० पैकी २८६ गुण मिळवून राज्यात तिसरा, महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा जळगाव परीक्षेत ३०० पैकी २६२ गुण मिळवून राज्यात तिसरा, राज्यस्तरीय मंथन परीक्षा नगर परीक्षेत ३०० पैकी २८६ गुण मिळवून राज्यात सातवा, राज्यस्तरीय एटीएस पुणे परीक्षेत ३०० पैकी २८८ गुण मिळवून राज्यात चौथा व राज्यस्तरीय एटीएस बार्शी परीक्षेत ३०० पैकी २८६ गुण मिळवून राज्यात पाचवा क्रमांक मिळविल्याबद्दल तसेच **कु.आदिती जयंत भांगे** (इ.१ली) हिने राज्यस्तरीय एटीएस(बार्शी) परीक्षेत १०० पैकी ९६ गुण मिळवून राज्यात तिसरा क्रमांक मिळविल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक

- **विलास निलकंठ भांगे (काका), लव्हे**
- **बालाजी मोहन भांगे (काका), लव्हे**
  एस.टी.डेपो मॅनेजर म.राज्य परिवहन
- **प्रदीप मोहन भांगे (काका), लव्हे**

# हार्दिक अभिनंदन



दहावीच्या परीक्षेत


**कु.केतकी गणेश कोरपे**

हिने ९७.२०% गुण मिळवून करमाळा तालुक्यात दुसरा व म.गांधी विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल हार्दिक अभिनंदनव पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

- **श्री.सोमनाथ भिमाशंकर चिवटे**(माजी उपनगराध्यक्ष)
- **बनशंकरी मोबाईल शॉपी, करमाळा**
- **बनशंकरी किराणा स्टोअर्स, करमाळा**
- **राशिनपेठ तरूण सेवा मंडळ, करमाळा**

# हार्दिक अभिनंदन ! हार्दिक अभिनंदन !!




श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित

## नवभारत इंग्लिश स्कूल, करमाळा.

**दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश**

**२५ वर्षांपासून १००% निकाल देणारी एकमेव शाळा**

सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या आयुष्यातील उज्वल भविष्यासाठी सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून खूप.. खूप.. शुभेच्छा !

**Now New Branch**
**At - Vetal Peth, Karmala.**

### गुणवंत विद्यार्थी

प्रथम

प्राप्ती अनुप दोशी (९३.४०%)

द्वितीय

संस्कृती मनोज काळे(९०.२०%)

तृतीय

प्राजक्ता प्रसाद उदावंत(९०%)

चौथा

निखिल नागेश देशमुख(९०%)

पाचवा

निकिता किरण ढेरे (८८%)


वैष्णवी महादेव सुपे(८७.२०%)


संस्कृती गजानन कुलकर्णी(८१%)


रोहन केशेगावकर (७५.८०%)


महेक अश्पाक शेख(७४.६०%)


समिक्षा उदय सुरवसे(७२.६०%)


विजय राजदत्त कांबळे(६९%)


सुहर्ष सुधीर शिंदे (६७%)


नितेश सचिन बोराडे(६६.६०%)


हर्षद प्रशांत सस्तारे(६६%)


तनिष्क सोमनाथ डबडे(६४.२०%)


हरीओम प्रकाश गोंदकर(६४%)


श्वेता विजय शिंदे (६२.४०%)


ओम औदुंबर बनकर(६२%)


फरहान शमशुद्दीन सय्यद(५४%)

- प्रत्येक class digital असणारी एकमेव शाळा.
- दूसरे Lead school पेक्षा कमी Fees
- Live Classes घेणारे devoted teachers
- Tab वर पूर्ण school वर नियंत्रण ठेवणारे director
- Grammer वर special attention
- 9th, 10th ला English शिकवणारे special teachers
- हिंदी, मराठी व्याकरणाचे परिपूर्ण मार्गदर्शन
- CCTV नी पूर्ण controlled school
- ISO Mark एकमेव school
- R.O. Water सुविधा असणारे एकमेव school
- Nursery, L.K.G., U.K.G ला शिकवणारे पूर्ण trained teachers
- CCS, coding चे special classes असणारे एकमेव school

**Contact Admission Open....**

Mrs.Sunita Mohite (7741907285)
Mrs.Pallavi Dhale (8403461105)
Mrs.Sharda Kokil (9960522370)